महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर यांचे कार्यालय

## (गृह शाखा)

**मुख्य प्रशासकिय इमारत, पार्श्वनाथ ९ इमारत, नवली**
**ता.जि.-पालघर पिन कोड-४०१ ४०४**

**दुरध्वनी क्रमांक -०२५२५-२५३१११**
**Email ID: collectorpalghar@gmail.com**

**वाचले**

१) मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १२९.

---

क्र/गृह/का.१/टे.४/हेल्मेट परिपत्रक/कावि-१८७१/२०२०

दि.२९ /१२/२०२०

## परिपत्रक

ज्याअर्थी मोटार वाहन अपघातास परिणामकारक रित्या आळा बसावा व नागरीकांमध्ये वाहतूकीच्या नियमाचा प्रचार व प्रसार होणेकरीता दरवर्षी संपुर्ण देशभरात रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करणेत येतो. केंद्र शासनाच्या रस्ता सुरक्षा सप्ताहा सोबत राज्यात रस्ता सुरक्षा पंधरवडा साजरा करणेत येतो.

ज्याअर्थी मोटार वाहन अधिनियमचे १९८८ चे कलम १२९ मध्ये नमुद केलेनुसार कोणतेही दोन चाकी वाहन रस्त्यावर चालविताना हेल्मेट परिधान/घालणे हे सक्तीचे आहे. तसेच वेळोवेळी मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय यांनी देखील दुचाकी वाहन चालवताना हेल्मेट घालणे हे सक्तीचे असल्याबाबत निर्णय दिलेले आहेत.

त्याअर्थी मी **डॉ. माणिक गुरसळ, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा रस्ता सुरक्षा समिती** या परीपत्रकाव्दारे पालघर जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, सर्व शाळा, कॉलेज व सर्व शासकीय यंत्रणा यांच्या कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी जे दुचाकी वाहनाचा वापर करतात त्यांना मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १२९ अन्वये हेल्मेट घालणे सक्तीचे करीत आहे. सदर आदेशानंतर शासकीय, निमशासकीय, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, सर्व शाळा, कॉलेज व सर्व शासकीय यंत्रणामध्ये कार्यालयात येताना अथवा कोणत्याही कामासाठी दुचाकी वाहन वापरताना हेल्मेट घातलेले नसल्यास तो अधिकारी व कर्मचारी हा मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील. यापुढे मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १२९ चे उल्लघंन केल्यास त्यांची गंभीर नोंद घेण्यात येईल असे आज दि.२९ /१२ /२०२० रोजी आदेश देत आहे.

**सही/xxx**
**(डॉ माणिक गुरसळ)**
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत:-**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार, सेक्टर ०५, रामनगर, शांती गार्डन, मिरारोड (पुर्व), ठाणे-४०११०७ यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

६) कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

७) मुख्याधिकारी, नगरपरीषद पालघर/डहाणू/जव्हार यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

८) मुख्याधिकारी, नगरपंचायत मोखाडा/विक्रमगड/तलासरी/वाडा यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

९) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या प्रसिध्दीसाठी.

जिल्हा दंडाधिकारी जिल्हा पालघर

जिल्हादंडाधिकारी पालघर